११-६-१२

# मुंबई विद्यापीठ

क्रं. घ.म./ ७४ / २०१२ - २०१३

परिपत्रक :-

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानित आणि अशासकीय कायम विनाअनुदानित सर्व **कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, सोशल वर्क आणि होम सायन्स, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन, व स्थापत्यशास्त्र** महाविद्यालयातील प्राचार्य / अध्यक्ष / सचिव /संचालक यांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. ३० जून, २०१० च्या अधिसूचनेन्वये शिक्षक व समकक्ष पदांवरील नियुक्त्या सदर पदाचे किमान शैक्षणिक अर्हता, वेतनश्रेण्या, अनुषंगिक लाभ, प्रोत्साहनपर वेतनवाढी इत्यादी बाबी संदर्भात निर्गमित केलेले आदेश राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व समकक्ष पदांना लागू करणेबाबत शासनाने शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१२/(१०४/१२)/विशि-१, दिनांक २२ मे, २०१२ अन्वये पूरक-पत्राच्या अनुषंगाने आदेश निर्गमित केलेला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेत क्रमांक २०१२०५२२१७१७५६५५६००१ आणि विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ५ जून, २०१२

कुलसचिव

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानित आणि अशासकीय कायम विनाअनुदानित सर्व **कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, सोशल वर्क आणि होम सायन्स, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन, व स्थापत्यशास्त्र** महाविद्यालयातील प्राचार्य यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी सादर.

प्रत माहीतीस्तव सादर :-

१) सर्व महाविद्यालये आणि संस्था यांचे सचिव
२) मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
३) मा. संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१.
४) सह संचालक, मुंबई विभाग, मुंबई - ४०० ००१.
५) सह संचालक, पनवेल विभाग, पनवेल, जिल्हा - रायगड.
६) पीठासन अधिकारी, न्यायासन विभाग, मुंबई विद्यापीठ आणि श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.
७) मुंबई विद्यापीठ, महाविद्यालयीन प्राचार्य संघटना, ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे.(दोन प्रती)
८) सचिव, अशासकिय महाविद्यालयीन प्राचार्य संघटना, रामनारायण रूईया महाविद्यालय, मांटुगा, मुंबई - ४०० ०१९
९) मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघटना आणि महाविद्यालयीन कर्मचारी संघटना, क्लब हाऊस, बी रोड, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.(दोन प्रती)
१०) संचालक, तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१.

---

कुलसचिव ७/६/१२

प्रत :-

१) संचालक, महाविद्यालये आणि विद्यापीठ विकास मंडळ.
२) संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग.
३) संचालक, दूर आणि मुक्त शिक्षण संस्था.
४) वित्त आणि लेखा अधिकारी
५) परिक्षा नियंत्रक, परिक्षा भवन.
६) सर्व उपकुलसचिव, सहायक कुलसचिव आणि स्वीय सहायक, कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०३२.
७) स्वीय सहायक, प्रभारी कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४००·०३२.
८) अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.३० जून, २०१० च्या अधिसूचनेन्वये शिक्षक व समकक्ष पदांवरील नियुक्त्या सदर पदाचे किमान शैक्षणिक अर्हता, वेतनश्रेण्या , अनुषंगिक लाभ, प्रोत्साहनपर वेतनवाढी इत्यादी बाबीं संदर्भात निर्गमित केलेले आदेश राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व समकक्ष पदांना लागू करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण -२०१२/(१०४/१२)विशि-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक : २२ मे, २०१२

वाचा -
१) भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास विभागाचे पत्र क्र.1-32/2006-U-II/U.I(i) दि. ३१ डिसेंबर, २००८
२) शासन निर्णय क्र.एनजीसी-२००९/(२४३/०९)विशि-१, दि.१२ ऑगस्ट, २००९
३) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र. F-3.1/2009 दि.३० जून, २०१०
४) भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास विभागाचे पत्र क्र.F.1-7/2010-U-II दि. ११ मे २०१०
५) भारत सरकारचे राजपत्र दि.१८-२४ सप्टेंबर, २०१०
६) क्र. शासननिर्णय क्र. संकिर्ण-२०११/(२५/११)/ विशि-१; दि.१५ फेब्रुवारी २०११

## पुरकपत्र (Addendum)

विद्यापीठ अनुदान आयोगाने संदर्भाधीन क्र.३ येथील दि.३० जून, २०१० च्या अधिसूचनेन्वये केंद्रीय विद्यापीठे व महाविद्यालय / संस्था मधील शिक्षक व समकक्ष पदांवरील नियुक्त्या सदर पदाचे किमान शैक्षणिक अर्हता, इत्यादी निश्चित केलेल्या आहेत. तसेच सदर पदावरील अध्यापकांच्या वेतनश्रेण्या , अनुषंगिक लाभ, प्रोत्साहनपर वेतनवाढी इत्यादी बाबतीतही निदेश दिलेले आहेत.

२. विद्यापीठ अनुदान आयोगाची उक्त दि.३० जून, २०१० ची अधिसूचना केंद्रशासनाच्या दि.१८-२४ सप्टेंबर, २०१० च्या राजपत्रात प्रसिध्द झालेली आहे. सदर अधिसूचनेतील उक्त बाबी राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकीय व शिक्षक समकक्ष पदाच्या बाबत संदर्भाधीन क्र. ६ येथील दि. १५ फेब्रुवारी, २०११ च्या शासन निर्णयन्वये लागू करण्यात आलेल्या आहेत. उक्त दि. ३० जून,२०१० च्या अधिसुचनेमधील परिच्छेद क्र ४.२.० मध्ये प्राचार्य पदासाठी अनुभव व अर्हता निश्चित केलेली आहे. दिनांक ३० जून,२०१० ते १४ फेब्रुवारी, २०११ या कालावधीत नियुक्त झालेल्या प्राचार्यांच्या नियुक्त्या अवैध ठरु नयेत म्हणून वरील परिच्छेद क्र. ४.२.० (iii) मधील अनुभवाची अट दि. १५ फेब्रुवारी, २०११ च्या शासन निर्णयान्वये शिथिल करण्यात आली आहे.

३. याद्वारे असेही स्पष्ट करण्यात येते की, दि. ३० जून,२०१० ते १४ फेब्रुवारी, २०११ या कालावधीमध्ये ज्या प्राचार्यांची पूर्वीच्या विहीत नियमाप्रमाणे नियुक्त्या झाली असेल त्या प्राचार्यांच्या सेवाशर्तीवर संदर्भाधीन क्र. ६ मधील दि. १५ फेब्रुवारी, २०११ च्या शासन निर्णयातील तरतूदींचा विपरित परिणाम होणार नाही.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharastra.govt.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यांचा संकेताक क्रमांक २०१२०५२२१७१७५६५५६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

(विकास तु. कदम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
३) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) संचालक, तंत्रशिक्षण / व्यवसाय शिक्षण / [illegible], महाराष्ट्र राज्य, मुंबई
६) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे
७) महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई
८) महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) नागपूर
९) सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण / तंत्रशिक्षण /व्यवसाय शिक्षण / कला / ग्रंथालय,
१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१२) सर्व कार्यासंन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग
१३) निवड नस्ती, विशि-१